ISBN-978-93-91305-33-8

संत साहित्य कार्य: चर्चा व चिंतन

■ प्रा. डॉ. पंकज शं. वानखेडे

■ प्रथम आवृत्ती – २८ सप्टेंबर ,२०२१

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

बडनेरा रोड, अमरावती

■ Price : 200/-

ISBN-978-93-91305-33-8

ISBN-978-93-91305-33-8

# संत साहित्य,

# कार्य : चर्चा व चिंतन

संपादक

प्रा. डॉ. पंकज शं. वानखेडे

मराठी विभाग प्रमुख

नरसम्मा परिवार,कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

किरण नगर,अमरावती.

आधार पब्लिकेशन्स, अमरावती

अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख / लेखक | पु.क्र. |
|---|---|---|
| 1 | संत मीराँबाई — डॉ.प्रमोद परदेशी | 1 |
| 2 | श्रीचक्रधर स्वामींचा स्त्रीवादी विचार — प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | 7 |
| 3 | संत मुक्ताबाईची अभंगवाणी — डॉ. प्रवीण घारपुरे | 12 |
| 4 | संत नामदेवांच्या अभंगातील सामाजिक विचार — प्रा. डॉ. डिगोळे बालाजी विठ्ठलराव | 22 |
| 5 | संत नामदेव यांच्या अभंगातील कृष्णभक्ती — डॉ. अण्णा प्र. वैद्य | 29 |
| 6 | भक्ती तत्वज्ञानाचा वारकरी - संत सावता माळी — प्रा. महेंद्र खुशालगीर गिरी | 39 |
| 7 | संत चोखामेळाच्या अभंगातील भक्तिभाव — डॉ.श्याम मु.जाधव | 45 |
| 8 | विठ्ठलाचा चोख उपासक संत चोखामेळा — प्रा.डॉ.एकनाथ वैजनाथ भिंगोले | 49 |
| 9 | संत साहित्यातील संत चोखामेळा यांचे ''समतावादी विचार" — प्रा.डॉ. मंदाकिनी मेश्राम | 56 |
| 10 | संत चोखामेळा यांच्या अभंगांतील आर्थिक विचाराचे स्वरूप — प्रा.डॉ.गणेश शिवाजी मारेवाड | 60 |
| 11 | समर्थ रामदासांचे कार्य व कर्तृत्व : एक संक्षिप्त आढावा(सामाजिक, राजकीय, धार्मिक, वांङ्मयीन असा सर्वांगीण दृष्ट्य विचार) — प्रा. डॉ. चंद्रशेखर सुधाकर देवघरे | 66 |
| 12 | संत तुकाराम महाराजांचे समाज प्रबोधनात्मक विचारप्रा. — सुपारे यु.पी. | 73 |
| 13 | थोर समाजसुधारक : संतकवी तुकाराम — प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 81 |
| 14 | संत तुकारामांचे सामाजिक विचार — प्रा.डॉ.शिल्पा दिपक काकडे | 87 |
| 15 | संत तुकाराम महाराज यांचे सांस्कृतिक व समाज प्रबोधनात्मक विचार — प्रा. प्रफुल ई. ढोके | 91 |
| 16 | तुकाराम महाराज यांचें सामाजिक विचार — प्रा.डॉ. मिलिंद भिवाजी कांबळे | 98 |
| 17 | तुकाराम महाराज आणि त्यांचे चौदा टाळकरी — डॉ. न. ह. खोडे | 102 |
| 18 | संत तुकाराम यांचे विद्रोही विचार — प्रा.डॉ. वंदना भोयर | 110 |
| 19 | संत बहिणाबाईच्या काव्यातील विद्रोह (विशेष संदर्भ—आत्मचरित्र व वज्रसूची) — डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | 114 |
| 20 | संत गाडगेबाबांचे दशकलमी तत्त्वज्ञान — प्रा.डॉ.गजानन एस. फुटाणे | 126 |
| 21 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक विचार — प्रा. विजय डी. वाकोडे | 132 |
| 22 | भजनातून क्रांती घडविणारा संत : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज — प्रा. डॉ.विजय राऊत | 137 |
| 23 | आधुनिक संत - राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज — प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके | 144 |
| 24 | ग्रामगीतेतील राष्ट्रसंतांचे कृषि विषयक विचार — अभिनव गजानन फुटाणे | 149 |

समारोप :—

संत तुकारामांनी समाजातल्या अनिष्ठ प्रथा, परंपरा आणि नैतिक बलसंवर्धनाचा उपदेश केला. समाज कल्याणासाठी परस्परांना सहाय्य करावे. सन्मार्ग स्वीकारावा. परोपकारीवृत्तींचे पालन करावे. चित्तशुध्द झाले की शत्रूही मित्र होतो. असा उपदेश संत तुकारामांनी सोळाव्या शतकातील भोळ्या, अज्ञानी, अशिक्षित लोकांना केला आहे. त्याकरीता त्यांनी अभंगाद्वारे वेगवेगळी उदाहरणे, रूपके स्पष्ट करून सांगीतली एका समाजोन्नतीच्या उर्मीने लोकशिक्षणाचे खडतर कार्य संत तुकारामांनी युध्द पातळीवर केले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :—**

१)विष्णू बुवा जोग महाराज :— सार्थ श्री तुकारामांची गाथा, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई, १९९३

२) शं. दा. पेंडशे :— साक्षात्कारी संत तुकाराम, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९८२

३) डॉ. ल. का. मोहरीर :— संत तुकारामांची जीवननिष्ठा, सविता प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९९४



## संत तुकारामांचे सामाजिक विचार

**प्रा.डॉ.शिल्पा दिपक काकडे**
संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेडराजा,
जि.बुलढाणा.मो.नं.९५४५४०३९९९

आजच्या आधुनिक काळातील माणसाला कितीही भौतिक सुखे मिळाली तरी त्याला जीवनातील खरे समाधान मिळत नाही. संत साहित्य हे जगण्यातील सुख आणि आनंद मिळवून देते. जीवनावर प्रेम करायला शिकविण्याचा संतांचा विचार महत्वाचा ठरतो. मानवी जीवनावरची अविचल निष्ठा, प्रेम, समाधान, वात्सल्य, सुख, शांती, माणुसकीचा ओलावा ही चिरंतन मूल्ये संत साहित्यातून मिळतात. त्यामुळे संत साहित्य हे समाजासाठी आजही प्रेरक आहे. तसेच प्रत्येक काळाला जवळचे वाटणारे आहे.

आपल्या देशातील सर्व संतांनी **माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे** हा विश्वव्यापी विचार मांडला. माणसामाणसात भेद करणे, हा एक शुध्द भ्रम आहे, हे ओळखून सर्व संतांनी मानवतावादाची शब्द-पूजा बांधली. सारा समाज सुखी, संपन्न समर्थ, सुरक्षित, सत्शील आणि समंजस बनविण्यासाठी संतांनी केलेले शब्द-प्रबोधन प्रभावी ठरते. समाजप्रबोधनातून समाज परिवर्तन करण्यासाठी सर्व संतांनी काव्यरचना केली. भजन, कीर्तन आणि प्रवचन अशा विविध मार्गांचा अवलंब केला.

सर्व जातीतल्या सर्व माणसांना आपल्या हृदयाशी धरून त्यांना प्रबोधित करणारी संत तुकारामाची वाणी, विचार आणि साहित्य या दोन्ही दृष्टींनी सरस आणि संपन्न ठरली आहे.

तुकारामांच्या कवितेतून व्यापक सामाजिक जाणिवा व्यक्त होतात. तुकारामांच्या विचारातून, साहित्यातून समाजातील आचार, विचार आणि नीतीनियमांचे संकेतही सहजपणे व्यक्त होतात. समाजातील चांगली, वाईट, सज्जन, दुर्जन, दुष्ट, लोभी, कर्मठ, दांभिक, स्वार्थी अशा विविध प्रवृत्तींच्या माणसांचे चित्रण करतात. समाजातील भ्रष्टता आणि कुटूंबातील विसंवादही मांडतात. समाज जीवनाचे व्यापक चित्र प्रदीर्घ अनुभवाच्याद्वारे तुकाराम मांडतात. समाजातील नैतिक मूल्यांची विचारसूत्रे त्यांच्या कवितेतून व्यक्त होतांना दिसतात.

आज एकविसाव्या शतकात आंधळ्या भोगवादाची एक प्रचंड हार साऱ्या जगातच आलेली दिसते. भारतीय जीवनही या लाटेपासून अलिप्त राहिलेलं नाही. अशा वेळी तुकोबांचे विचार आजही आपल्या उपयोगी पडून आपले रक्षण करु शकतील. तुकारामांचं चरित्र हे आदर्शाचं प्रतीक आहे. या चरित्रातूनच समता आणि ममता यांचा संदेश मिळतो. माणूस कसा सुखी होईल या विवंचनेत व्याकूळ झालेले तुकोबा म्हणतात,

**उपकारासाठी बोले हे उपाय | येणेविण काय आम्हां चाड |**
**बुडता हे जन न देखवे डोळा | येतो कळवळा म्हणवूनि ||**
**तुका म्हणे माझे देखतिल डोळे | भोग देते वेळे येईल कळो ||**

ISBN-978-93-91305-33-8

**कोणाचे हे चाले सुख-दुःख ने मानितां ॥ १ ॥**

माणूस जिवंत असताना वेळच्या वेळेला त्याच्याकडे लक्ष दिले जात नाही. त्याच्या इच्छा, आकांक्षा पुरविल्या जात नाहीत. मेल्यावर मात्र पिंडदानावर व्यर्थ खर्च केला जातो.

**भुकें नाही अन्न । मेल्यावर पिंडदान ॥ १ ॥**
**हे तों चाळवा चाळवी । केलें आपण चि जेवी ॥ धृ. ॥**
**नैवेद्याचा आळ । वेच ढाकणी सकळ ॥ २ ॥**
**तुका म्हणे जड । मज न राखावें दगड ॥ ३ ॥**

तुकारामांनी कर्मकांडावर आघात केले. माणूस जिवंत असतांना त्याच्याकडे लक्ष दिले पाहिजे, असे आवर्जून सांगितले. कर्मठ रुढी आहेत त्या माणसाने बंद केल्या पाहिजेत, असे विचार त्यांनी मांडले.

समाजात कसे वागावे आणि कसे वागू नये याचे चित्रण तुकारामांनी कवितेत केले आहे. समाजातील सज्जन, दुर्जन, दुष्ट, उत्तम सांसारिक, आपमतलबी, अहंकारी, लोभी, अनाचारी, ढोंगी अशा विविध प्रवृत्तीच्या माणसांचे चित्रण व त्याविषयीचे विचार त्यांनी कवितेत केले आहे. तुकारामांनी समाजातील स्त्रीची विविध रुपे कवितेत मांडली आहेत. संस्काराशील तसेच जीवनात नैतिक अधिष्ठान सांभाळून जगणारी स्त्री कुटूंबाचा आधार असते. व्याभिचारी स्त्री अनेक कुटूंबांचा विध्वंस करते. धर्मव्यवस्थेतील भोंदूगिरी, कर्मकांड, अवडंबर माजविणा-या पोटभर ढोंगी साधू - संन्यासांचा निषेध करतात. समाजातील वर्गव्यवस्था आणि श्रेणी व्यवस्थेचे चित्रण करतात. व्यक्ती-व्यक्तीच्या बदलातून समाजाबद्दलची, परिवर्तनाची प्रक्रिया घडविण्याचे काम त्यांचे विचार करतात.

एक चांगली वैचारिक दृष्टी समाजासमोर आचरणासाठी ठेवतात. समाजाला जागृत करुन आपल्या बरोबर आणि काळाच्या पुढे नेण्याची वैचारिक दृष्टी तुकाराम प्रभावीपणे मांडतात. आपली समाजपुरुषाची भूमिका यशस्वीपणे पार पाडतात. त्यामधून त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व व्यक्त होते. सामाजिक समतेच्या संदर्भात पुढे फुले-आंबेडकरांनी जी चळवळ उभी केली, तिची बीजे तुकोबांच्या जीवनविचारात आणि कार्यात आढळतात. सर्व जातीतल्या सर्व माणसांना हृदयाशी धरुन त्यांना प्रबोधित करणारी तुकारामांची वाणी, विचार आणि साहित्य या दोन्ही दृष्टिंनी सरस व संपन्न आहे.



ISBN-978-93-91305-33-8

# संत तुकाराम महाराज यांचे सांस्कृतिक व समाजप्रबोधनात्मक विचार

प्रा. प्रफुल ई. ढोके
मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय, नरखेड
Mo.No. 9975368340 , Email. prafuldhoke1@gmail.com

संत तुकाराम हे सतराव्या शतकातील लोक संत होते. बहुजन समाजाला जागृत करून देव धर्म यासंबधी मते लोकांना पटवून देण्यामध्ये ते यशस्वी झाले. देव धर्मातील अनागोंदी त्या प्रमाणे भोळ्या समजूती प्रयत्न पुर्वक नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाज मनावरिल अंधश्रध्देचा पगडा दुर करून लोकांना नवा धर्म नवी भाषा देण्याचे काम संत तुकारामांनी केले. संत तुकारामांचे र्धं क्रांतीचे समाज प्रबोधन आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेले आहे. त्यांचे अभंग मानवी जीवनाला उपकारक ठरले आहे. संत तुकाराम गाथा म्हणजे बहुजनांची गिता आहे. ज्ञानोबा आणि तुकाराम म्हणजे महराराष्ट्राची सांस्कृतिक विद्यापिठे आहे. त्यांचे साहीत्य म्हणजे आध्यात्मीक ज्ञानाचा आधारवड आहे. ज्ञानेश्वरानंतर जनार्दन स्वामी, एकनाथ महाराज, नामदेव आणि त्यांनतर संत तुकाराम यांनी भागवत धर्माची पताका सर्वत्र फडकवली. भागवत धर्माचा कळस ठरलेल्या संत तुकारामांनी बहुजन समाजामध्ये पसरलेली धर्म कर्मकांडाची जळमटे आपल्या किर्तनातून पुसून टाकली. अींग वानी महाराष्ट्राच्या द—याखो—या मध्ये वसली. अभंग वानीतून सत्य धर्माची शिकवण जगाला संत तुकाराम यांनी दिली. सामाजिक परिवर्तनाची वादळ सर्वत्र पसरले. जाती धर्माची उतरंड त्यांनी मोडून काढली. गुलामगिरीची चौकट मोडली. बहुजन समाजामध्ये स्वाभिमान निर्माण केला.

**अध्ययनाचे उद्देश :—**

प्रस्तुत संशोधनकार्याचे उद्देश खालील प्रमाणे आहेत.

संत तुकाराम महाराज यांच्या सांस्कृतिक व समाजप्रबोधनात्मक विचारांच आढावा घेणे.

संत तुकाराम महाराज यांच्या वाङ:मयीन कार्याबद्दल जाणुन घेणे.

ISBN-978-93-91305-33-8

**कोणाचे हे चाले सुख-दुःख ने मानितां ॥ १ ॥**

माणूस जिवंत असताना वेळच्या वेळेला त्याच्याकडे लक्ष दिले जात नाही. त्याच्या इच्छा, आकांक्षा पुरविल्या जात नाहीत. मेल्यावर मात्र पिंडदानावर व्यर्थ खर्च केला जातो.

**भुकें नाही अन्न | मेल्यावर पिंडदान ॥ १ ॥**
**हे तों चाळवा चाळवी | केलें आपण चि जेवी ॥ धृ. ॥**
**नैवेद्याचा आळ | वेच ढाकणी सकळ ॥ २ ॥**
**तुका म्हणे जड | मज न राखावें दगड ॥ ३ ॥**

तुकारामांनी कर्मकांडावर आघात केले. माणूस जिवंत असतांना त्याच्याकडे लक्ष दिले पाहिजे, असे आवर्जून सांगितले. कर्मठ रुढी आहेत त्या माणसाने बंद केल्या पाहिजेत, असे विचार त्यांनी मांडले.

समाजात कसे वागावे आणि कसे वागू नये याचे चित्रण तुकारामांनी कवितेत केले आहे. समाजातील सज्जन, दुर्जन, दुष्ट, उत्तम सांसारिक, आपमतलबी, अहंकारी, लोभी, अनाचारी, ढोंगी अशा विविध प्रवृत्तीच्या माणसांचे चित्रण व त्याविषयीचे विचार त्यांनी कवितेत केले आहे. तुकारामांनी समाजातील स्त्रीची विविध रुपे कवितेत मांडली आहेत. संस्काराशील तसेच जीवनात नैतिक अधिष्ठान सांभाळून जगणारी स्त्री कुटूंबाचा आधार असते. व्याभिचारी स्त्री अनेक कुटूंबांचा विध्वंस करते. धर्मव्यवस्थेतील भोंदूगिरी, कर्मकांड, अवडंबर माजविणा-या पोटभर ढोंगी साधू - संन्यासांचा निषेध करतात. समाजातील वर्गव्यवस्था आणि श्रेणी व्यवस्थेचे चित्रण करतात. व्यक्ती-व्यक्तीच्या बदलातून समाजाबद्दलची, परिवर्तनाची प्रक्रिया घडविण्याचे काम त्यांचे विचार करतात.

एक चांगली वैचारिक दृष्टी समाजासमोर आचरणासाठी ठेवतात. समाजाला जागृत करुन आपल्या बरोबर आणि काळाच्या पुढे नेण्याची वैचारिक दृष्टी तुकाराम प्रभावीपणे मांडतात. आपली समाजपुरुषाची भूमिका यशस्वीपणे पार पाडतात. त्यामधून त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व व्यक्त होते. सामाजिक समतेच्या संदर्भात पुढे फुले-आंबेडकरांनी जी चळवळ उभी केली, तिची बीजे तुकोबांच्या जीवनविचारात आणि कार्यात आढळतात. सर्व जातीतल्या सर्व माणसांना हृदयाशी धरुन त्यांना प्रबोधित करणारी तुकारामांची वाणी, विचार आणि साहित्य या दोन्ही दृष्टिंनी सरस व संपन्न आहे.



ISBN-978-93-91305-33-8

# संत तुकाराम महाराज यांचे सांस्कृतिक व समाजप्रबोधनात्मक विचार

प्रा. प्रफुल ई. ढोके
मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय, नरखेड
Mo.No. 9975368340 , Email. prafuldhoke1@gmail.com

संत तुकाराम हे सतराव्या शतकातील लोक संत होते. बहुजन समाजाला जागृत करून देव धर्म यासंबधी मते लोकांना पटवून देण्यामध्ये ते यशस्वी झाले. देव धर्मातील अनागोंदी त्या प्रमाणे भोळ्या समजूती प्रयत्न पुर्वक नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाज मनावरिल अंधश्रध्देचा पगडा दुर करून लोकांना नवा धर्म नवी भाषा देण्याचे काम संत तुकारामांनी केले. संत तुकारामांचे धं क्रांतीचे समाज प्रबोधन आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेले आहे. त्यांचे अभंग मानवी जीवनाला उपकारक ठरले आहे. संत तुकाराम गाथा म्हणजे बहुजनांची गिता आहे. ज्ञानोबा आणि तुकाराम म्हणजे महराराष्ट्राची सांस्कृतिक विद्यापिठे आहे. ज्ञानेश्वरानंतर त्यांचे साहीत्य म्हणजे आध्यात्मीक ज्ञानाचा आधारवड आहे. ज्ञानेश्वरानंतर जनार्दन स्वामी, एकनाथ महाराज, नामदेव आणि त्यांनतर संत तुकाराम यांनी भागवत धर्माची पताका सर्वत्र फडकवली. भागवत धर्माचा कळस ठरलेल्या संत तुकारामांनी बहुजन समाजामध्ये पसरलेली धर्म कर्मकांडाची जळमटे आपल्या किर्तनातून पुसून टाकली. अींग वानी महाराष्ट्राच्या द—याखो—या मध्ये वसली. अभंग वानीतून सत्य धर्माची शिकवण जगाला संत तुकाराम यांनी दिली. सामाजिक परिवर्तनाची वादळ सर्वत्र पसरले. जाती धर्माची उतरंड त्यांनी मोडून काढली. गुलामगिरीची चौकट मोडली. बहुजन समाजामध्ये स्वाभिमान निर्माण केला.

**अध्ययनाचे उद्देश :—**

प्रस्तुत संशोधनकार्याचे उद्देश खालील प्रमाणे आहेत.

संत तुकाराम महाराज यांच्या सांस्कृतिक व समाजप्रबोधनात्मक विचारांचा आढावा घेणे.

संत तुकाराम महाराज यांच्या वाङ:मयीन कार्याबद्दल जाणुन घेणे.